VALENCIA NUTRITION LTD
**Corporate Office:** 601A, Neelkanth Business Park, 6th Floor, A Wing, Nathani Road
Vidyavihar (West), Mumbai - 400086. • T.: +9122 25094351/2
E.: consumer@valencianutrition.com • W.: www.valencianutrition.com
**Regd office:** Valencia Nutrition Ltd ,Shop No 4, B Wing,
Paramount Building,Tilak Nagar, Mumbai 400089.

**Date: November 15, 2022**

To,
The Department of Corporate Services
**BSE Limited**
Phiroze Jejeebhoy Towers,
Dalal Street, Fort,
Mumbai - 400 001

**Ref :- Scrip Code: 542910**
**ISIN : INE08RT01016**

**Sub: Submission of Newspaper publication of Extract of Standalone Un-audited Financial Results for the Half year ended on September 30,2022.**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we are hereby submitting the newspaper publication of an Extract of Standalone un-audited Financial Results for the half year ended on September 30, 2022, as published in the Financial Express-English and Pratahkal - Marathi in November 15, 2022 edition.

Kindly take the same on record.

Thanking You,
**Yours Truly,**
**For Valencia Nutrition Limited**

JAY JATIN SHAH

Digitally signed by JAY JATIN SHAH
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6e699ed7db46afedeafac7913c40c5ecc3d5f189d07e7da1284e6c93be987a0d, postalCode=400077, street=505, NANDADEVI, NEELKANTH VALLEY, 7TH ROAD, RAJAWADI, GHATKOPAR EAST, MUMBAI 400077, serialNumber=d4cec2061be621ac277b9cb4593ec4766968582a94f824c69b6b052478efd910, o=Personal, cn=JAY JATIN SHAH, pseudonym=18d4152085d680f77054a1ded49184c2
Date: 2022.11.15 12:03:56 +05'30'

**Jay Shah**
**Whole-Time Director & CFO**
**(DIN: 09072405)**
**(PAN: BJPPS6293E)**

***Encl: a/a***

## संपादकीय

# गोवरचा विळखा आणि आजारांशी लढाई!

गेल्या दोन दशकानंतर जगात पुन्हा एकदा गोवर हा आजार डोके वर काढत आहे. याबाबत जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) गंभीर इशाराही दिला आहे. डब्ल्यूएचओच्या अहवालानुसार २०१९ मध्ये गोवरमुळे २ लाख नागरिक मृत्यूच्या दाढेत गेले आहेत. एवढेच नव्हे तर गेल्या दोन दशकात या आजाराच्या सर्वाधिक रुग्णांची नोंद झाली आहे. हा आजार नियंत्रित करण्याच्या प्रयत्नांवर करण्यात आलेल्या उपाययोजनांवर आता वाढत्या रुग्णसंख्येमुळे पाणी फेरले असल्याचेही दिसून येत आहे. डब्ल्यूएचओ आणि सीडीसीच्या अहवालानुसार गेल्या दहा वर्षात लसीकरण ठप्प झाले असल्यानेच या आजारात वाढ झाल्याचा दावा करण्यात आला आहे. जागतिक महामारी कोविड-१९ मुळे जगातील विविध आजार रोखण्यासाठी जे लसीकरण केले जाते त्याचा वेग मंदावला असल्यामुळेच जुने आजार पुन्हा डोके वर काढत असल्याचे म्हटले आहे. डब्ल्यूएचओच्या अहवालानुसार कोविड-१९ मुळे लसीकरणाचा वेग मंदावला असून २६ देशातील जवळपास ९ कोटींपेक्षा अधिक लोकांना या आजाराने विळखा घातला आहे.

काही देशांमध्ये गोवरने पुनश्च डोके वर काढल्याचे दिसत आहे. सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, जॉर्जिया, समोआ, युक्रेन, कांगो, मादागास्कर, उत्तर मॅसेडोनिया सह अन्य मोठ्या देशांमध्येही या आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ झाली आहे. युनिसेफच्या कार्यकारी संचालक हेनरीएटा फोर यांनी गोवर आणि कोविड-१९ चा धोका अद्यापही टळलेला नाही याकडे लक्ष वेधले. जागतिक महामारीमुळे अन्य आजारांविरोधात लढा देण्यात अडचणी उद्भवत असल्याचेही त्यांनी नमूद केले. गोवर आजारावर उपचार आहे परंतु जोपर्यंत ९५ टक्के मुलांचे लसीकरण केले जात नाही तोपर्यंत त्यावर नियंत्रण मिळविणे अशक्य आहे, असेही हेनरीएटा म्हणाल्या. मर्यादित प्रमाणात वॅक्सीन असल्यामुळे दरवर्षी हजारो मुले या आजाराला बळी पडत आहेत. त्यामुळेच आजार पसरण्यास सुरुवात होते. कोरोनामुळे बहुतांश देशातील आरोग्य यंत्रणा ढेपाळल्या असल्याचे निदर्शनास आल्यामुळेही गोवर लसीकरण ठप्प झाले आहे. परंतु ज्या कोरोना संसर्गाने अमेरिका आणि युरोपीय देशांमध्ये हाहाकार माजविला आहे, त्या कोरोनामुळे भारताचे मात्र तुलनेने कमी नुकसान झाले. एवढेच नव्हे तर प्रभावी लस तयार करण्यातही भारताने महत्त्वाची भूमिका बजावली. परंतु असे पहिल्यांदाच घडत आहे, असे नाही. यापूर्वीही देशाने गोवर, प्लेग, अतिसार, कावीळ आदी साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळविले आहे.

कोरोना संसर्ग रोखण्यासाठी भारताने योजलेल्या कठोर उपाययोजना अनावश्यक असल्याचे सुरुवातीला काही देशांनी म्हटले होते. मात्र, आता या देशांच्या दृष्टिकोनात बदल झाला आहे. कारण हर्ड इम्युनिटी म्हणजे समूह प्रतिकारशक्तीवरून असे दिसून येते की, प्रत्येक १० व्यक्तींमागे एका व्यक्तीला कोरोनाचा संसर्ग झाला होता. हा आकडा थोडा कमी केला, तरी अनुमान असे आहे की, भारतात सुमारे ६ ते ७ कोटी लोकांना कोरोनाचा संसर्ग होऊन गेला आहे. संसर्गाचा सामना करण्याच्या बाबतीत भारत इतर देशांच्या तुलनेत खूपच आघाडीवर राहिला. त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे लस तयार करण्यात भारताला आलेले यश. आजमितीस डझनावारी असे देश आहेत, जे भारताकडून लस मिळेल यासाठी आशेने आपल्याकडे पाहत आहेत.

एखाद्या जागतिक संसर्गाशी यशस्वीपणे, दक्षतेने आणि झुंजारपणे लढा देण्याची भारताची ही काही पहिलीच वेळ आहे असे नाही. यापूर्वीही अनेक अक्राळविक्राळ आजारांना भारताने हद्दपार केले आहे. विशेषतः गोवर आणि पोलियो हे आजार भारताने हद्दपार केले. एके काळी भारतीय समाजासाठी हे दोन आजार म्हणजे एक मोठे आव्हान होते. गोवर या आजाराशी भारताने तीन दशके न थकता मुकाबला केला. १९४७ मध्ये जेव्हा देश स्वतंत्र झाला, तेव्हा इंग्रजांपेक्षाही मोठी समस्या या देशात गोवरची होती. १९६२ मध्ये राष्ट्रीय गोवर निर्मूलन कार्यक्रमास सुरुवात झाली.

दुर्दैवाने त्याच वर्षी भारत आणि चीन यांच्यात युद्धाचा भडका उडाला. अन्यथा गोवर लसीकरणात भारताला त्याच वेळी यश आले असते. परंतु चीनसोबत युद्धात गुंतलेला असूनसुद्धा भारताने लसीकरणाचा कार्यक्रम बंद केला नाही. अर्थात, युद्धामुळे तो कार्यक्रम काहीसा क्षीण नक्कीच झाला. १९७५ मध्ये म्हणजे सुमारे १३ वर्षांनंतर या मोहिमेला यश मिळाले. गोवरचा अंतिम रुग्णही त्या वर्षी बरा झाला. १९७७ ला भारत गोवरमुक्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

गोवर विरुद्ध युद्ध जिंकण्यासाठी भारताने जो निग्रह दाखविला, त्याचे जगात कौतुक झाले. परंतु भारताने गोवरपाठोपाठ प्लेग निर्मूलन कार्यक्रम हाती घेतला. एके काळी भारतात प्लेगने ४४ लाख लोकांचा मृत्यू झाला होता. भारताने प्लेगविरुद्धची झुंज ८० चे दशक सुरू होण्यापूर्वी केली. १९९४ मध्ये आपण या आजाराविरुद्धची लढाई निर्णायकपणे जिंकली. सुमारे ३५ हजार कोटी रुपये यासाठी खर्च करावे लागले. त्या पाठोपाठ अतिसाराशी झुंजण्याची वेळ आली. भारतात १८१७ ते १८२४ या कालावधीत अतिसार सर्वप्रथम कोलकत्यात पसरला. काही दिवसांतच हजारो लोक मारले गेले. पुढील दशकात भारतात दहा लाख लोक अतिसाराने मारले गेले. १९६० च्या दशकात भारतात पुन्हा एकदा अतिसाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर दिसून आले. परंतु या आजाराविरुद्ध जेव्हा भारताने निर्मूलन मोहीम छेडली, तेव्हा ९० चे दशक सुरू होता-होता केवळ काही रुग्णच उरले. २००७ मध्ये ओडिशात अतिसाराचे अखेरचे काही रुग्ण ओडिशामध्ये दिसून आले. त्यानंतर अतिसाराने त्रस्त असलेला एकही रुग्ण भारतात आढळला नाही. यानंतरची मोठी लढाई पोलिओ विरुद्ध होती. पोलिओ हा एक असा आजार आहे, जो अनुवंशिकरीत्या पिढ्यान्पिढ्या पाठलाग करू शकतो. भारताने पोलिओ विरुद्धही मोठी लढाई लढली आहे. सन १९७७ मध्ये भारताने प्रथमच पोलिओचे पोटात घेण्याचे डोस बनविले आणि विविध राज्यांमध्ये पोलिओ मुक्ती अभियान सुरू केले. १९९५ मध्ये हे अभियान एकाच वेळी संपूर्ण देशभरात राबविण्यात आले. त्यासाठी देशभरात ६ लाख ४५ हजारपेक्षाही जास्त पोलिओ बूथ तयार करण्यात आले आणि या अभियानाच्या माध्यमातून सुमारे २५ लाख लोकांना एकत्र आणण्यात आले. कोणत्याही एका आजारासाठी एवढी मोठी लढाई त्यापूर्वी कधी झाली नव्हती. आपल्या पोलिओविरोधी मोहिमेचे जगभरातून जबरदस्त कौतुक झाले. सन २०१४ मध्ये भारत निर्णायक रित्या पोलिओमुक्त घोषित करण्यात आला.

गोवरप्रमाणेच मलेरिया हाही एक घातक संसर्गजन्य आजार आहे. या आजाराविरुद्ध आपण राष्ट्रीय स्तरावर युद्ध पुकारले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, भारतात मलेरियामुळे दरवर्षी २ लाख रुग्ण दगावले होते. तथापि गेल्या दहा वर्षांत मलेरियामुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. त्यानंतर अनेक संशोधनेही झाली असून, त्यातून असे स्पष्ट झाले आहे की, गोवर आणि पोलिओपाठोपाठ मलेरियाचीही या देशातून लवकरच हकालपट्टी होईल. कारण भारताने निर्णायक युद्धासाठी अनेक लशी विकसित केल्या आहेत. म्हणजेच, ज्याच्याविरुद्ध संपूर्ण देशाने एकसाथ खांद्याला खांदा लावून लढा दिला, असा कोरोना हा एकमेव आजार नव्हे. यापूर्वी अनेक आजारांशी लढाई लढून आपण विजयी ठरलो आहोत. किंबहुना आजारांशी लढून त्यांच्यावर विजय मिळविणे ही आपल्याला जडलेली एक सवयच आहे, असे म्हणावे लागेल.




# इंग्रजांशी संघर्ष- सरदारी लढाई!

क्रांतिवीर भ.बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. सन १९०२मध्ये ब्रिटिशांनी छोटा नागपूर टेनन्सी अ‍ॅक्ट मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले. आदिवासींचे हक्क, स्त्री-स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांची ओळख आहे. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ त्यांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारला आहे. तसेच त्यांच्या स्मृती नेहमी ताज्या रहाव्यात यासाठी रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास त्यांचे नाव देण्यात आले आहे. सन १८५७च्या क्रांतीनंतर इंग्रजांनी छोटा नागपूर प्रदेशातील मुंडा जमातींच्या शेतजमिनी हिरावून घेतल्या होत्या. त्या परत मिळविण्यासाठी मुंडांचे प्रमुख ज्यांना सरदार म्हटले जात, त्यांनी इंग्रजांविरुद्ध संघर्ष सुरू केला. तो संघर्ष सरदारी लढाई म्हणून प्रसिद्ध झाला. या आंदोलनात्मक लढाईचा भगवान बिरसांच्या मनावर मोठा प्रभाव पडला होता. त्यांनी इंग्रजांच्या गुलामीत असलेल्या आदिवासी समाजाला मुक्त करण्यासाठी क्रांतिकारक चळवळीला सुरुवात केली. त्यामुळे अनेक मुंडा जमातींनी त्यांच्यासोबत सरदार आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी चालविलेले व्यापक आंदोलन दडपण्यासाठी इंग्रजांनी दोन नियम-अटी लागू केले होते- १) इंग्रजांनी अनेक ठेकेदारांना दारूचे अड्डे चालविण्यासाठी परवाने दिले. अशिक्षित मुंडा आदिवासी नेहमी दारूच्या नशेत राहून ते आंदोलनापासून अलिप्त राहतील, असा त्यांचा हेतू होता. भगवान बिरसांनी या नियमांना विरोध करत इंग्रजांविरुद्ध आवाज उठविला. आदिवासी बांधवांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. २) गावागावांत जेवढ्या आदिवासींच्या जमिनी आहेत, त्यांवर सरकारी वनाधिकाऱ्यांचा अधिकार आहे. या नियमामुळे मुंडा लोकांचा जगण्याचा अधिकार हिरावला जाऊन समाजाचे नुकसान होणार होते.

क्रांतिवीर भगवान बिरसा मुंडा हे आदिवासी समाजक्रांतीचे जनक व एक स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचा जन्म दि.१५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलिहातू या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे वडील सुगना व आई करमी हे होत.

जन्म गुरुवारी म्हणजे बिस्युतवार किंवा बृहस्पतिवार या दिवशी झाला, म्हणून त्यांचे नाव बिरसा ठेवण्यात आले. त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे त्यांच्या जन्मानंतर सर्व कुटुंब उदरनिर्वाहासाठी त्यांची आत्या दासकीर हिच्या आयुभातू या गावी गेले. बासरी व टुईला वाजविणे, नृत्य, नकला, चित्र रेखाटणे, आखाड्यात जाणे इत्यादी छंदही त्यांच्या अंगी होते. मुंडांना शिक्षणाची खुप आवड होती. सुरुवातीला ते आयुभातूजवळ सलगा गावच्या आश्रमात जात. ते आश्रम जयपाल नाग हा आदिवासी व्यक्ती चालवित होता. पुढे सन १८८६ मध्ये बिरसांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले. तत्पूर्वी शाळेच्या अटीनुसार त्यांना ख्रिश्चन धर्म स्वीकारावा लागला. शाळेमध्ये जर्मन लुथेरियन मिशनचे अध्यक्ष फादर नोट्रोट यांनी भाषणात मुंडा आदिवासींबद्दल ठग, चोर, बेइमान इत्यादी शब्दांचा वापर केला. तेव्हा त्यांनी फादर नोट्रोट यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. त्यामुळे सन १८९० या चौथ्याच वर्षी बिरसांना शाळेतून काढण्यात आले. पुढे त्यांनी शिक्षणासाठी अंगीकारलेल्या ख्रिश्चन धर्माचा त्याग केला. उदरनिर्वाहासाठी ते चार वर्षे बांदगाव येथे वास्तव्यास होते. त्यांचा विवाह हिरीबाई नामक मुलीशी झाला; परंतु अल्प काळातच तिचे निधन झाले. त्यांनी आनंद पांडे या वैष्णव पंथीयांकडून धार्मिक शिक्षण घेतले. हे शिक्षण घेत असताना मुंडा जमातीच्या परंपरागत जीवनपद्धतीमध्ये, धर्मामध्ये परिवर्तन व सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. हिंदू, ख्रिश्चन व मुंडा आदिवासी या धर्मांतील चांगली तत्त्वे एकत्रित करून नव्या बिरसाईट धर्माची स्थापना केली. यासाठी त्यांनी लोकसंघटन करून मुंडा जमातीत एकता निर्माण केली. ईसाई धर्म हा विदेशी असल्यामुळे तो आपल्या पूर्वजांच्या परंपरेला कलंकित करणारा आहे, अशी लोकजागृती ते करू लागले. त्यामुळे ते भगवान बिरसा म्हणून ओळखले जाऊ लागले.

सन १८९४मध्ये आदिवासी भागात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडला होता. इंग्रजांकडून कोणतीही मदत मिळत नव्हती. उलट, इंग्रजांनी आदिवासींकडून जमीन महसूल ठरावीक तारखेलाच रोख स्वरूपात भरण्याची सक्ती केली. त्यामुळे

**एन. के.कुमार जी**

अनेकांना आपल्या जमिनी सावकार आणि जमीनदार यांच्याकडे गहाण ठेवाव्या लागल्या. भरमसाठ व्याजदरांमुळे तारण ठेवलेल्या जमिनी सोडवून घेणे, त्यांना अशक्य बनले. जमीनमालकी असणारे लोक भूमिहीन व वेठबिगार बनले. त्यामुळे बिरसांनी इंग्रजांविरुद्ध आदिवासी तरुण बांधवांचे संघटन केले. समाजबांधवांनी एकत्र येऊन धोकेबाज इंग्रजांना यमसदनी पाठवावे. त्यामुळे आपले राज्य येईल, असे ते सांगत. त्यांच्या शब्दांमुळे अनेक मुंडांनी ठेकेदार व इंग्रजांच्या कामास जाणे बंद केले. इंग्रजांपेक्षा आपण बलाढ्य कसे आहोत? हे सांगून ते समाजामध्ये नवचेतना निर्माण करीत. त्यांनी स्वराज्याची घोषणा करून इंग्रज शासनापुढे सशक्त आव्हान निर्माण केले. त्यामुळे इंग्रज शासनाने त्यांना बंदी करण्याचे ठरविले. ब्रिटिशांनी दि.२६ ऑगस्ट १८९५ रोजी भ.बिरसा व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडले. त्या सर्वांच्या अटकेमुळे पुन्हा मुंडा समाजात इंग्रजांविरुद्ध असंतोष निर्माण झाला. अखेर दि.३० नोव्हेंबर १८९७ रोजी बिरसांची सुटका झाली. तुरूंगातून सुटल्यानंतर भगवान बिरसांनी सेवादलाची स्थापना केली. गावोगावी गुप्त बैठका घेऊन मुंडाराज्य स्थापन करण्याच्या शपथा घेण्यात आल्या. त्यामध्ये सुमारे पाच हजार आदिवासी समाजबांधव सामील झाले होते. त्यांनी कायद्याची लढाई सोडून दि.२५ डिसेंबर १८९९पासून इंग्रज अधिकारी, इंग्रजधार्जिणे ठेकेदार, जमीनदार, सावकार व ख्रिश्चन धर्मप्रसारक यांच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेत प्राणघातक हल्ले करण्यास सुरुवात केली. सिंगभूम, चक्रधरपूर, रांची, खुंटी, कोरा, तामाड आदी प्रदेशांतील पोलिस चौक्या जाळण्यात आल्या. या मुक्ती आंदोलनाला मुंडारी भाषेत उलगुलान असे म्हणतात. या आंदोलनात आदिवासींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. पोलिसांच्या गोळीबारात व मुंडांच्या तिरकामठ्यांद्वारे हजारो पोलिस व त्यांचे सहकारी मारले गेले. अखेर भ.बिरसांना शह देण्यासाठी इंग्रजांनी कूटनीतीचा वापर केला. त्यांना जो कोणी पकडून देईल त्याला इंग्रजांकडून पाचशे रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. पैशाच्या लालसेपोटी मनमारू व जवाईकेला या गावातील काही युवकांनी भ.बिरसा जंगलात असल्याची बातमी इंग्रजांना दिली. त्यामुळे ते दि.३ फेब्रुवारी १९०० रोजी बिरसांना पकडू शकले. रांची येथे कैदेत असताना इंग्रजांनी त्यांचा अतोनात छळ केला. तेथेच त्यांचे दि.९ जून १९०० रोजी निधन झाले.

!! जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या समाजक्रांतीला मानाचा मुजरा !!

# शिक्षण आणि धर्माची चुकीची सांगड घालणे थांबले पाहिजे!

हैद्राबाद शहरातील 'आयसीएफेआय फाऊंडेशन फॉर हायर एज्युकेशन' या खासगी विद्यापीठाच्या 'बीबीए – एलएलबी'च्या हिमांक बंसल या विद्यार्थ्याला त्याचाच विद्यापीठातील अनुमाने २० विद्यार्थ्यांकडून अमानुष मारहाण करण्यात आली. या सर्व कुकृत्याची क्लिप सोशल मीडियावर वेगात प्रसारित होत आहे. विशेष म्हणजे पीडित विद्यार्थ्याला मारहाण करताना विशिष्ट धार्मिक घोषणा देण्याची सक्ती करण्यात येत असल्याचे दिसत आहे. ती व्यवस्थित न दिल्याने त्याला कानफटवले जात आहे. त्याही पुढे जात त्याच्या अंगावर बसून त्याला मारहाण होत आहे. त्यावेळी तो तोंड झाकत असताना दुसरा त्याच्या तोंडावर फटाफट मारत आहे. तर अंगावर बसलेला त्याचे पाकीट काढून घेत आहे. आणखी एक जण त्याला त्या वेळी लाथा मारत आहे. त्याला बेडवरून खाली ढकलून दिलेलेही दिसत आहे. अशी क्रूर वृत्ती असणाऱ्यांना विद्यार्थी म्हणता येत नाही. यामध्ये पीडित विद्यार्थ्याचा जीव किती धोक्यात होता? हे उघड झाले आहे. ती क्लिप प्रसारित झाल्यावर त्या मुलाचे पालक किती मानसिक दडपणाखाली आले असतील? तसेच त्याचे नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी हेसुद्धा चिंतीत झाले असतील. कारण प्रसंगच इतका भीषण होता गुन्हेगारी वृत्ती आणि हिंसक विचारधारा असलेली निर्दय व्यक्तीच अमानुष मारहाण करण्यास धजावू शकते. कारण तिच्या लेखी अमानुष मारहाण, चोरी या गोष्टी सामान्य असतात. हे विद्यार्थी उद्या समाज, देश यांच्यासाठी काय योगदान देणार? ज्यांच्या नसानसांत इतका राग महाविद्यालयीन शिक्षण घेताना प्रकट रुपात दिसत आहे ते उद्या नोकरीवर गेल्यावर काय उजेड पाडणार? तिथेही अशीच झुंडशाही करून दहशत माजवण्याचा प्रयत्न केल्यास तिथून हाकलले जाणार आणि आम्ही बेरोजगार म्हणून उर बडवायलाही सिद्ध असणार. परिणामी घरच्यांसाठी डोकेदुखी होणार. त्यामुळे या उन्मत्त विद्यार्थ्यांच्या पालकांनीसुद्धा आपल्या पाल्याचे विकृत रूप ओळखावे. मुलांच्या शिक्षणावर पालक खर्च करतात. पण तीच मुले झुंडशाही कुठून शिकली? आणि त्यांना लाथाबुक्क्यांची भाषा कशी अवगत झाली? याचा पालकांनी विचार करावा. अशी उपद्रवी मुले म्हणजे समाजाला लागलेली किडच आहेत. त्यांना वेळीच अटकाव केला नाही तर देशात विविध शिक्षण संस्थांत अशा घटनांची पुनरावृत्ती होण्याचा धोका नाकारता येत नाही. महंमद पैगंबराविषयी वादग्रस्त टिप्पणी करत ईशनिंदा केल्याचा मारहाण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आरोप आहे. या सूत्राला धरून ते विद्यार्थी विद्यापीठ व्यवस्थापनाकडे रीतसर तक्रार करू शकले असते. मात्र त्यांनी तसे न करता थेट कायदा हातात घेत सदर विद्यार्थ्याला बेदम चोपले. या प्रकरणाकडे वरवर न पाहता ते अत्यंत गंभीरपणे घेतले पाहिजे. २० विद्यार्थी एका मुलावर अत्याचार करतात. हे किती अमानवी आणि संतापजनक आहे? शिक्षणापेक्षा धार्मिक सूत्रांकडे विद्यार्थ्यांचे वाढत चाललेले आकर्षण कुठल्या हिंसक वळणावर जाऊ शकते. याचा परिपाक म्हणजे पीडित विद्यार्थ्याला झालेली मारहाण होय. मारहाण करणारी ती मुले खरतर पशुवृत्तीच्याही पलिकडे गेली आहेत. ती घेत असलेल्या शिक्षणासह त्यांच्यावर कोणती धार्मिक सूत्रे, व्यक्ती, राजकीय संघटना आदींचा पगडा आहे. हे कळले पाहिजे. तसेच त्या २० मुलांच्या पालकांचेही अमानुष कृत्याविषयीचे मत जाणणे आवश्यक

**जयेश राणे**

आहे. शिकवण्याचा तास चालू असताना विद्यार्थी शिक्षकांच्या समोर असतात. त्यांनतर ते महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये अथवा वाचनालय या ठिकाणी असतात. तर काही जण वसतिगृह, घरी परततात. महाविद्यालयात जातो असे सांगणारे. पण प्रत्यक्षात तिथे न जाता महाविद्यालय संपल्याच्या वेळेत घरी जाणारे विद्यार्थीही आहेत. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्त काय चर्चा करतात? कुठे जातात? यांवरही लक्ष ठेवणे म्हणजेच कानोसा घेणे महाविद्यालयांसाठी आवश्यक आहे. कारण देशात दिवसेंदिवस शिक्षण आणि धर्म यांची चुकीची सांगड घातली जात आहे. विद्यार्थ्यांची माथी भडकवण्याचे दुष्कर्म केले जात आहे. केवळ शिक्षण एके शिक्षण करून चालणार नाही. अन्यथा अचानक कुठल्या तरी विद्यार्थ्याला मारहाण झाल्याचे समोर येईल. व्यवस्थापनाचा धाक विद्यार्थ्यांना पाहिजे. बेशिस्त, उद्दाम आणि उपद्रवी विद्यार्थ्यांचे वागणे समज देऊनही बदलत नसेल तर दयामाया न दाखवता त्यांचे नाव कमी करण्यात यावे.


## SANMIT INFRA LIMITED

(Formerly known as ASIA HR TECHNOLOGIES LIMITED)
CIN-L70109MH2000PLC288648
Registered Office : 601, Makhija Royale, 6th Floor, S. V Road, Khar (W), Mumbai, Maharashtra, 400052 Tel. : 022-67429100, Fax.: 022-67429123, Email : info@sanmitinfra.com Website : www.sanmitinfra.in

UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH SEPTEMBER 2022

| Particulars | Standalone (Rs. In Lacs) Quarter Ended 30.09.2022 | Quarter Ended 30.09.2021 |
|---|---|---|
| Total income from operations (net) | 3,276.24 | 3,508.86 |
| Net Profit / (Loss) from ordinary activities before tax | 93.28 | 234.28 |
| Net Profit / (Loss) from ordinary activities after tax | 101.04 | 195.18 |
| Net Profit / (Loss) for the period before tax (after Extraordinary items) | 93.28 | 234.28 |
| Net Profit / (Loss) for the period after tax (after Extraordinary items) | 101.04 | 195.18 |
| Paid up Equity Share Capital (Face Value Rs. 10/- per Equity Share) | 1,580.80 | 1,580.08 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | | |
| Earnings Per Share (before extraordinary items) (of Rs. 10/- each) | | |
| Basic : | 0.64 | 1.24 |
| Diluted: | 0.64 | 1.24 |
| Earnings Per Share (after extraordinary items) (of Rs. 10/- each) | | |
| Basic : | 0.64 | 1.24 |
| Diluted : | 0.64 | 1.24 |

Notes :
1) Previous year/period figures have been regrouped/reclassified wherever necessary.
2) The above results have been reviewed by the Audit Committee and have been approved by the Board of Directors at their respective meeting held on November 14, 2022. The results for the quarter ended 30th September 2022 have been subjected to limited review by the Auditors
3) The company operates in only one of the segment and therefore disclosure under Ind AS-108 " Operating Segment" is not required.

For SANMIT INFRA LIMITED
Sd/-
SANJAY MAKHIJA
Managing Director
(DIN:00586770)

Place : Mumbai
Date : 14/11/2022

## KACHCHH MINERALS LIMITED

CIN: L15543MH1981PLC024282
Reg. Office: 22 Mansur Bldg, 1st Floor, 98 Princess Street, Mumbai - 400 002, MH, IN
Tel.No. 022-2201 0028 Email ID: kachhmineral@yahoo.in

Extract of Audited Financial Results for the Quarter and Half Year Ended on 31st September, 2022

(Amt in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31/03/2022 | Previous Quarter Ended 31/06/2022 | Half Year Ended 31/09/2022 | Year Ended 31/03/2022 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income | 1.21 | 60.09 | 61.31 | 117.81 |
| 2 | Total Expenditure | 14.54 | 39.91 | 54.58 | 101.07 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (13.33) | 20.18 | 6.73 | 16.74 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (13.33) | 20.18 | 6.73 | 16.74 |
| 5 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (13.33) | 20.18 | 6.73 | 16.74 |
| 6 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (13.33) | 20.18 | 6.73 | 16.74 |
| 7 | Equity Share Capital | 521.18 | 521.18 | 521.18 | 521.18 |
| 8 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | (371.95) | (371.95) | (371.95) | (371.95) |
| 9 | Earnings Per Share (before extraordinary items) (of Rs. 10/- each) | | | | |
| | Basic : | 0.25 | 0.38 | 0.13 | 0.32 |
| | Diluted: | 0.25 | 0.38 | 0.13 | 0.32 |

Note: a) The above is an extract of the detailed format of Quarterly and Yearly Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly and Yearly Financial Results is available on the www.bseindia.com and www.kachchhminerals.com

For KACHCHH MINERALS LIMITED
Sd/-
DAKSH NARENDRABHAI TRIVEDI
(Director)

Place: Mumbai
Date: 14/11/2022

## VALENCIA NUTRITION LIMITED

Regd Off.: SH-4, A Wing, Bldg. No. 34, Tilak Nagar, Chembur Sahvas Co-operative HSG Soc, Mumbai: 400 089.
CIN: L51909MH2013PLC381314
Email Id: info@valencianutrition.com
Phone No: 7977252840

EXTRACT OF STANDALONE UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE HALF YEAR ENDED SEPTEMBER 30, 2022

(Rs. In Lakhs)

| Sr No. | Particulars | Half Year ended on September 30, 2022 Unaudited 30-09-2022 | March 31, 2022 Unaudited 31-03-2022 | September 30, 2021 Unaudited 30-09-2021 | Year Ended on March 31, 2022 Audited 31-03-2022 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from operations | 53.58 | 0.04 | - | 0.04 |
| 2. | Net Profit/ Loss for the period before Tax, Exceptional and/or Extraordinary items | (46.16) | (41.11) | (25.42) | (66.53) |
| 3 | Net profit/(Loss) for the period before Tax (after Exceptional and/ or Extraordinary items) | (46.16) | (41.11) | (25.06) | (66.17) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | (46.16) | (41.11) | (25.06) | (66.17) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | - | - | - | - |
| 6 | Equity Share Capital | 558.53 | 558.53 | 558.53 | 558.53 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | (545.01) | (498.86) | (457.75) | (498.86) |
| 8 | Earnings Per Share (of Rs 10/- each) (for continuing and discounted operations) | | | | |
| 1. | Basic: | (0.83) | (0.73) | (0.45) | (1.18) |
| 2. | Diluted: | (0.83) | (0.73) | (0.45) | (1.18) |

Note:-
The above is an extract of the detailed format of Standalone Unaudited Financial Results for the half year ended September 30, 2022 filed with the Stock Exchange under Regulation 33 of SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the half yearly Financial Results are available on the websites of the Stock Exchange i.e. http://www.bseindia.com and on the website of the Company at www.valencianutrition.com

VALENCIA NUTRITION LIMITED
Sd/-
Jay Shah
Whole-Time Director & CFO
(DIN: 09072405)
(PAN: BJPPS6293E)

Place: Mumbai
Date: 14/11/2022

## वसई विकास सहकारी बँक लि.

मुख्यकार्यलय :- चिम्माजी आप्पा मैदानासमोर, वसई गांव एस.टी. स्टॅंड जवळ, वसई (प), पालघर ४०१२०१ .
दुरध्वनी क्रं. ०२५० - २३२६९८४/२३२६९९८ मो ९०११०५५३८४

### मागणी सूचना
### [कलम १३ (२)]

ज्याअर्थी,
वसई विकास सहकारी बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकार यांनी सिक्युरिटायझेशन अॅड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) अ‍ॅक्ट, २००२ (सरफैशी) अन्वये आणि दि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ सहवाचता कलम १३ (१२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीत सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रक्कमेचा भरणा करण्यासाठी कर्जदारांना बोलाविण्याकरिता वेगवेगळे कर्जदार/संचालक/गहाणदारांना मागणी सूचना निर्गमित केली. सदर सूचना ही कर्जदारांना रजिस्टर/स्व:हस्ते छारे पाठविण्यात आली पण त्यांच्या ठिकाणी उपलब्ध नसल्यामुळे संबंधित पक्षकारांना बजाविता येऊ शकला नाही. तरी, खालील नमुद केल्यानुसार कर्जदार/हमीदार/संचालक यांना सदर सूचना प्रकाशनापासून ६0 दिवसांत खालील नमूद एकूण रक्कमेचा भरणा करण्यासाठी सदर सूचनेद्वारे बोलविण्यात आले आहे, कसूर केल्यास प्राधिकृत अधिकारी हे खालील नमूद तारण/जंगम गहाण मालमत्तांच्या विरूध्द सरफेसी ऑक्ट, २००२ च्या कलम १३ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करण्यास भाग पडेल.

| कर्जदार/गहाणवटदार/ हमीदाराचे नाव | स्थावर गहाण मालमत्तेचे वर्णन | [कलम १३ (२)] अन्वये एस एन जारी केल्याचे दिनांक | मागणी सूचनेतील नमूद थकीत रक्कम |
|---|---|---|---|
| श्रीमती. स्वाती आशिष दोडके | सदनिका क्रं. सी/१०३, सी विंग पहीळा मजला, "शिवम ईनक्लेव", कृलाई मंदीर रोड, जि.प. शाळे समोर, सफाळे पुर्व, पो. उबंरपाडा, ता.व जि. पालघर ४०११०२ | ३०/०६/२०२२ | १५,६६,२८८/- |

३०/०६/२०२२ रोजी प्रमाणे थकबाकी सह ०१/०७/२०२२ पासून त्यावरील लागु पुढील व्याज आणि प्रभार सदर सूचना ही कायद्याच्या कोणत्याही अन्य लागू तरतुदीन्वये योग्य, बरोबर आणि आवश्यक मानल्यानुसार अशी अन्य कार्यवाही किंवा कायदेशीर कार्यवाही सुरू करण्याच्या बँकेच्या हक्काला बाधा येऊ न देता आहे.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
वसई विकास सहकारी बँक लि.
(सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत)

ठिकाण : वसई
दिनांक : १४/११/२०२२